# कृषी विचार

दिशा नव्या कृषीपर्वाची..!

वर्ष : २ ▸ अंक : ११ ▸ मार्च २०१६ ▸ ₹ 40.00

कृषी मासिक







# भावपूर्ण श्रध्दांजली



स्व. पद्मश्री भवरलालजी जैन

## एन. एस. पाटील – संपादक
## व कृषी विचार परिवार, कोल्हापूर



## संपादकीय

एन. एस. पाटील संपादक, कृषी विचार
मोबा. 77 98 49 77 11

# कृषी क्षेत्रातील संशोधनाचा मार्गदर्शक हरपला !

कोणतेही कार्य करण्यासाठी व कार्य सिद्धीस नेण्यासाठी ध्यास, अभ्यास, चिकाटी, धाडस, नावीन्य शोधण्याची वृत्ती, बदलाला समोर जाण्याचा स्वभाव अशा प्रकारचे गुण अंगी असावे लागतात.

असाच एक मनुष्यअवतार जामनेर तालुक्यातील वाकोद या गावी भवरलालजी जैन यांच्या रूपाने अवतरला आणि पाहता पाहता अगदी अल्प कालावधीतच कृषी उद्योगास नवी दिशा, नवा विचार त्यांनी दिला. ठिबक सिंचन व तुषार सिंचनाचे मोठे जाळे देशभरात विणले आणि लाखोंच्या संख्येने शेतकरी वर्ग त्यामुळे जोडला गेला. ज्या ज्या शेतकऱ्यांनी जैन इरिगेशनचे तंत्रज्ञान आत्मसात केले, त्या सर्वांची आर्थिकदृष्ट्या भरभराट झालेली आहे. जैन हायटेक अ‍ॅग्रीकल्चर इन्स्टिट्यूटमार्फत केले जाणारे संशोधन पाहण्यासाठी देशभरातील लाखो शेतकरी येत असतात. जैन पाईप, जैन ठिबक, जैन पीई पाईप, जैन स्प्रिंकलर, जैन रेनपोर्ट, जैन टिश्यू कल्चर, जैन ग्रीन हाऊस, जैन सोलर पंप, जैन प्लंबिंग, जैन ड्रिप्कीट, न्यूट्रीकेअर, इरिकेअर या प्रकारचे कृषी क्षेत्राशी निगडित उद्योग सुरू केले व आपली बांधिलकी जोपासली.



स्व. भवरलालजी जैन

महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या कृषी विकासासाठी या पृथ्वीतलावर पुन्हा पुन्हा भवरलालजी जैन यांच्यासारखे कृषिदूत जन्माला येणे ही काळाची गरज आहे.

◆◆



# स्व. भवरलालजी जैन

# भावपूर्ण श्रद्धांजली !

## शेतकऱ्यांचा द्रष्टा हरपला : माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार

''शेती, शेतकरी व शेतात राबणारे मनुष्यबळ यांचे जीवनमान उंचावण्यात भवरलालजी जैन यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले असून आयुष्यभर त्यांनी बळीराजाच्या विकासाचा ध्यास अंगी बाळगला. या द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वाची परमेश्वराला गरज भासली असेल म्हणून त्याने भंवरलालजींना देवाघरी बोलाविले'', या शब्दात माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी श्रद्धांजली अर्पण केली. सर्वच गोष्टी आपल्या हातात नसतात. काही गोष्टींसाठी खूप झुंजावे लागते. भवरलालजींना आयुष्यात अनेक संकटे आली. या संकटांवर त्यांनी मात करीत कामाचा डोंगर उभा केला. शेतीतील नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी दुसऱ्या बाजूला संशोधनावरही त्यांनी भर दिला. देशावर, शेतीवर शिवारात राबणाऱ्या माणसांच्या हिताचा विचार करून नव्या संशोधनाचा लाभ बळीराजाला कसा देता येईल हाच ध्यास त्यांनी शेवटपर्यंत जपल्याचे शरद पवार म्हणाले. माझ्या त्यांच्याशी अनेकवेळा चर्चा व्हायच्या. चर्चेतले विषय केवळ कृषी क्षेत्राशी निगडित असायचे. कृषी क्षेत्राशिवाय भारताला महासत्ता होता येणार नाही हे लक्षात घेत आमच्या चर्चा या कृषी क्षेत्राभोवतीच असायच्या. आजवरच्या आमच्या मैत्रीत कधीही राजकारण वा व्यक्तिगत लाभाची चर्चा त्यांनी कधी केली नाही, असेही स्पष्ट केले.

त्यांच्या निधनाने दु:ख जरूर झाले आहे. या दु:खावर आता अश्रू ढळू न देता भवरलालजींच्या स्वभावातील जिद्द, चिकाटी घेऊन संकटावर मात करून नवनिर्माणाची ऊर्मी बाळगणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांची पुढची पिढी हे कार्य समर्थपणे पुढे नेईल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.



## भाऊंच्या अंत्यसंस्काराला जलसंपदा मंत्री झाले जळगावातील सामान्य भूमिपुत्र

राज्यभरातून भवरलालजी जैन यांच्या अंत्यसंस्काराला अनेक मान्यवर उपस्थित झाले होते. यात राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजनही होते. भाऊंचे जन्मगाव असलेल्या वाकोदच्या जामनेर तालुक्यातून गिरीशभाऊंचा राजकीय प्रवास सुरू झाल्याने त्यांचा भाऊप्रती एक वेगळा स्नेह होता. आपल्या जिल्ह्याचे नाव सातासमुद्रापार नेणाऱ्या भंवरलालजी जैन यांना ते नेहमी मार्गदर्शक मानायचे. आपल्या या लाडक्या आदर्शस्थानी असलेल्या व्यक्तिमत्त्वाला अखेरचा निरोप देणाऱ्या अंत्यसंस्कारप्रसंगी जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी राजकीय शिष्टाचार बाजूला ठेवत भूमिपुत्राच्या नात्याने विविध कामे उचलली. त्यांचा हा वावर सर्व शेतकऱ्यांच्या मनाला जाऊन भिडला.

## कर्मयोगी कृषिरत्न काळाच्या पडद्याआड : माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील

''गांधी विचारावर नितांत श्रद्धा ठेवत ज्यांनी केवळ शेती, शेतकऱ्यांसाठी आयुष्य वेचले, त्या शांतीस्वरूप कर्मयोगी कृषिरत्नाला आपण मुकलो आहोत'', या शब्दात भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचे कर्तृत्व हे अफाट आहे. ठिबकच्या माध्यमातून त्यांनी कृषी क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. आपल्या उद्योग-व्यवसायाचा जागतिक पातळीवर विस्तार साधूनही त्यांनी आपली भूमिका उद्योजकापल्याड नेऊन सामाजिक बांधिलकीसाठी विविध उपक्रम हाती घेणाऱ्यांमध्ये भाऊंचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल, असे त्या म्हणाल्या.

व्यावसायिक व कंपनीच्या विस्तारात सातत्याने गुंतलेले असतानाही त्यांनी व्यक्तिगत पातळीवरचे आपले स्नेहसंबंध तेवढ्याच जबाबदारीने सोज्वळतेने जपले. मी खानदेशकन्या असल्यामुळे मला ते सुरूवातीपासून बहीण मानत. एकही भाऊबीज माझी त्यांनी शुभेच्छाविना जाऊ दिली नाही. ते आजारी आहेत हे समजल्यावर मी त्यांच्याशी बोलले होते. हा परमेश्वराचा मिसकॉल ठरेल व भाऊ यातून सहीसलामत नेहमीप्रमाणे आजारावर मात करतील असे वाटले होते.



## कृषी क्षेत्राचे प्रेरणास्रोत आता शक्तिस्थळ बनो! : कृषिमंत्री एकनाथ खडसे

''भवरलालजी जैन हे देशातच नव्हे तर जागतिक पातळीवर कृषी क्षेत्रात क्रांती घडविणारे क्रांती पुरूष होते. त्यांच्या कार्यातून जळगावचे नाव जगभर सन्मानाने पुढे झाले. उद्योजक असूनही त्यांनी आपण सामान्य शेतकऱ्यांचे पुत्र आहोत याचा विसर न पडू देता आपली कष्टाची परंपरा कायम ठेवत त्याला गांधी विचारांची जोड दिली. त्यांचे कृषी क्षेत्रातील कार्य हे सर्वांसाठी प्रेरणास्रोत व शक्तिस्थळ राहील'', या शब्दांत महाराष्ट्राचे कृषिमंत्री एकनाथ खडसे यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. जैन यांचे हे योगदान लक्षात घेऊनच राज्य सरकारने विशेष बाब म्हणून शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

## जागतिक वॉटर युनिव्हर्सिटीचे त्यांचे स्वप्न आम्ही साकार करू : अनिल जैन

भवरलालजी जैन यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी जैन इरिगेशन परिवाराच्या वतीने भवरलालजी जैन यांचे सुपुत्र अनिल जैन यांनी सर्वांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करीत भाऊंनी जो निर्धार केला होता, त्या निर्धाराला आम्ही पूर्ण करू असे सांगितले. मागील काही वर्षापासून मोठ्या भाऊंनी जल नियोजनत जागतिक विस्तार साध्य केल्यानंतर एक विश्वविद्यापीठाची आखणी सुरू केली होती. याचबरोबर ग्रामीण भागातही शेतकरी जनतेला अत्यल्प किमतीत पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे यासाठी सौरऊर्जेच्या सहाय्याने विशेष संशोधन प्रकल्प हाती घेतला होता. या संशोधनाला जागतिक पातळीवर उत्कृष्ट तंत्रज्ञानाचे मानांकन बहाल झाले. हे या तंत्रज्ञानातून उभारलेले प्रकल्प जळगाव जिल्ह्यातील काही गावांत पोहोचवण्याचा त्यांचा निर्धार होता. त्यांचे हे स्वप्न आम्ही सर्वजण पूर्ण करू, असे अनिल जैन यांनी स्पष्ट केले. भाऊंचा कटाक्ष हा जळगावातील विविध सामाजिक उपक्रमांवरही होता. यात जळगावमध्ये सर्वसामान्यांना मोठ्या आजारांवर उपचार होतील अशा स्वरूपाचे एक अद्ययावत हॉस्पिटल उभारण्याचे त्यांच्या मनात होते. हे हॉस्पिटल लवकरच उभारले जाईल. याचबरोबर त्यांच्या नावे कृषी क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील एक मोठा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

**श्री. अनंत बागूल,** जाहिरात व्यवस्थापक,
जैन इरिगेशन् सिस्टीम्स् लि., जळगाव